# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४०० ००५.
दूरध्वनी: ०२२–२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२–२२१६ ३९७६
ई–मेल: mercindia@merc.gov.in संकेतस्थळ: www.mercindia.org.in / www.merc.gov.in


जाहिरात क्र.१२/२०१५–१६

## जाहीर सूचना

**प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि. (जी.इ.पी.एल.) ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, जिल्हा ठाणे, येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवाविषयक विशेष आर्थिक क्षेत्राला लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१५ वर जनतेकडून सूचना व हरकती मागविण्याबाबत**

मे. गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि. यांना भारत सरकारच्या वाणिज्यिक व उद्योग मंत्रालयाकडून विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ अंतर्गत प्लॉट क्र. आयटी–५ ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, जिल्हा ठाणे, येथील विशेष आर्थिक क्षेत्राकरिता ''विकासक'' म्हणून अधिसूचित करण्यात आले आहे.

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ (बी) सह विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ (एसइझेड अधिनियम) कलम ४ च्या उप–कलम (१) नुसार, मे. गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि. हे, भारत सरकारच्या एसइझेड अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या त्यांच्या वीज पुरवठा क्षेत्रातील ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी वीज वितरण यंत्रणेचे संचालन व देखभाल करण्याकरिता, एक मानीव वितरण परवानाधारक आहेत. आयोगाने सन २०१४ च्या प्रकरण क्र. १९८ मधील दि. २६ ऑक्टोबर, २०१५ च्या आदेशाने मे. गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि. यांच्या मानीव वितरण परवानाधारकाच्या दर्जास पुष्टी दिली आहे.

आयोगाने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १६ अंतर्गत, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि. (जी.इ.पी.एल.)च्या ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, जिल्हा ठाणे, येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१५ चे प्रारुप तयार केले आहे. सदर प्रारुप विनियमांची प्रत आयोगाच्या **www.merc.gov.in** किंवा **www.mercindia.org.in** या संकेतस्थळांवर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे. आयोग सदर प्रारुप विनियमांवर या जाहीर सूचनेद्वारा जनतेकडून/हितसंबंधितांकडून सूचना/हरकती मागवित आहे.

सदर सूचना/हरकती (१+५) सहा प्रतींमध्ये किंवा फॅक्स अथवा ईमेलद्वारे आयोगाचे सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४००००५, (फॅक्स–०२२–२२१६३९७६; ई–मेल: **www.mercindia@.gov.in**) यांना ३० नोव्हेंबर, २०१५ रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील अशा रितीने पाठवाव्यात.

आयोगाला ३० नोव्हेंबर, २०१५ रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त होणाऱ्या सर्व सूचना आणि/किंवा हरकती विचारात घेण्यात येतील.

**मुंबई** सही/–
**दि. ७ नोव्हेंबर, २०१५** **सचिव, मविनिआ**